**<u>उर्वरीत उलटतपास – श्री. आर. ई. चव्हाण वकील.</u>**

**२३**. आरोपी मार्फत आम्ही ४२ कोटीचे एक कर्जप्रकरण केले होते. आरोपीने आम्हाला प्रत्येकी ७,५०,०००/– चे तीन धनादेश दिले होते. आम्ही त्या तीनही धनादेशांच्या एकत्रीत २२,५०,०००/– रुपयांबाबत तक्रारी दाखल केल्या आहेत. आरोपीने धनादेश कोणत्या तारखेला दिले ते आता मला आठवत नाही. मी माझ्या शपथपत्रात व तक्रारीमध्ये आरोपीने कधी, कोठे व कोणासमक्ष धनादेश दिले याचा उल्लेख केलेला नाही. मी तक्रार व शपथपत्रामध्ये आरोपी कडून येणे असलेल्या धनादेशाच्या रकमेचा उल्लेख केला आहे.

**२४**. मी धनादेश देताना आरोपी सोबत कोण आले होते याचा तक्रारीत व शपथपत्रात उल्लेख केलेला नाही. आरोपीने सूतगिरणीच्या बाहेर धनादेश दिला होता. मी सदर बाब तक्रारीमध्ये व माझ्या शपथपत्रामध्ये नमूद केलेली नाही. मी सदर तक्रारीमध्ये आरोपी विरोधात दाखल केलेल्या इतर दोन तक्रारींचा उल्लेख केलेला नाही. मी तक्रारीमध्ये आरोपीने धनादेश वटण्याची हमी दिली तेव्हा कोण हजर होते याचा उल्लेख केलेला नाही. मी त्यांची शपथपत्रे न्यायालयात दाखल केलेली नाहीत.

**२५**. आरोपीने वादातील धनादेश सूचना दिल्यानंतर सादर करण्यास सांगितले होते. वादातील धनादेश भरण्यापूर्वी आरोपीने जानेवारी २०२५ च्या पहिल्या आठवडयात दूरध्वनीद्वारे सहमती दिली होती. आम्ही धनादेश सादर करण्यापूर्वी आरोपीला *व्हॉटस् अ‍ॅप* द्वारे कोणताही संदेश केला नव्हता. मी वादातील धनादेश दि.१४.१२.२०२४ रोजी सादर केला नव्हता, मी तो १०.०१.२०२५ रोजी दाखल केला होता. मी तो धनादेश आरोपीने सहमती दिल्यानंतर भरला होता. मी आरोपीने जानेवारी महिन्यात फोन केल्याचे दाखवणारा दूरध्वनीचा खातेउतारा सादर केलेला नाही.

**२६**. आम्ही आरोपीला कर्जमंजूरीसाठी दिलेली रक्कम परत मिळण्यासाठी नोटीस पाठवलेली नाही. आम्ही रक्कम मागण्याबाबत आरोपीशी पत्रव्यवहार केला होता. मी त्याच्या प्रती तक्रारी सोबत दाखल केलेल्या नाहीत. मी तक्रारीमध्ये आरोपी सोबत

मंजूर झालेल्या कर्जाची रक्कम नमूद केलेली नाही. मी आरोपीने दिलेल्या तीन धनादेशां बाबत दि.२८.०३.२०२५ रोजी तीन वेगवेगळी प्रकरणे दाखल केली आहेत. मी तक्रारीमध्ये त्याबाबत मजकूर नमूद केलेला नाही. मी प्रत्येक तक्रारीमध्ये स्वतंत्र धनादेशाचा मजकूर नमूद केलेला आहे.

**२७**. आमच्या संस्थेला येणारे धनादेश सुरक्षा रक्षकामार्फत प्रवेशद्वारावरुन वित्त विभागाकडे जमा केले जातात. आरोपीने दिलेले धनादेश सुरक्षा रक्षकामार्फत वित्त विभागाकडे जमा झाले होते. आरोपीने माझ्याकडे दिलेले धनादेश मी सुरक्षा रक्षकाकडे जमा करण्यासाठी दिले होते. आरोपीने दिलेल्या धनादेशांची संस्थेच्या वित्त विभागाकडे नोंद झाली आहे. मी त्या नोंदीचा उतारा तक्रारी सोबत दाखल केलेला नाही. आरोपीने धनादेश बंद पाकिटात आणून दिले होते. मी ते पाकिट न पाहता सुरक्षा रक्षकामार्फत पाठवून दिले होते.

**२८.** मी सन २०२४ साली आरोपी आमच्या संस्थेत आल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा अथवा त्याबाबतचा साक्षीदारांचा जबाब तक्रारी सोबत दाखल केलेला नाही. मी मागील उलट तपासामध्ये मान्य केल्याप्रमाणे, सुनिल नांगरे व अनिल चव्हाण जुलै २०२१ च्या पहिल्या आठवडयात आमच्या संस्थेत आल्याबाबतच्या नोंदीचा, आम्ही आरोपीला भेटण्यास जाण्यासाठी घेतलेला प्रवास उतारा, आरोपीने ऑगस्ट २०२१ मध्ये आम्हाला पाठवलेल्या अटी व शर्तीचे पत्र, आरोपी व त्याच्या सोबत पडताळणीसाठी आलेल्या लोकांच्या नोंदी घेतल्या बाबतच्या रजिस्टरच्या प्रती, आरोपीला कर्जासाठी वारंवार फोन करुन नोव्हेंबर २०२४ मध्ये शेवटचा संपर्क केल्याबाबतचा सी. डी. आर. अहवाल आणि कर्ज घेण्यासाठी संचालक मंडळाने घेतलेल्या ठरावाची प्रत दाखल केलेली नाही. *(संदर्भ – परिच्छेद क्र.१०, १४, १५, १८, २०).*

**२९**. आता मला मी आरोपी विरोधात दाखल केलेल्या सं. फौ. ख. क्र.१७३/ २०२५ आणि १७४/२०२५ च्या तक्रारीच्या व त्यावरील आदेशाच्या प्रमाणित प्रती दाखवल्या, त्यांना अनुक्रमे **नि. क्र.३४ व ३५** देण्यात येतात. आता मला आरोपीने केलेल्या कर्जमागणी अर्जाची (पान क्र.१३ ते ३३ वरील) मूळ प्रत

दाखवली, त्यावरती आमच्या संस्थेचे व्हॉईस चेअरमन देशपांडे यांची स्वाक्षरी आहे. साक्षीदाराने उलट तपासा दरम्यान सदर दस्त मान्य केल्यामुळे त्याला **नि. क्र.३६** देण्यात येतो. सदर कर्जमागणी अर्जातील पान क्र.१९ वरील अटी व शर्तीवरती व्हॉईस चेअरमन देशपांडे यांची स्वाक्षरी आहे. आता मला आमच्या संस्थेने आरोपीला करुन दिलेले पान क्र.३४ ते ४३ वरील शपथपत्र दाखवले, साक्षीदाराने उलट तपासा दरम्यान सदर शपथपत्र मान्य केल्यामुळे त्याला **नि. क्र.३७** देण्यात येतो. सदर शपथपत्रावरती व्हॉईस चेअरमन देशपांडे, जनरल मॅनेजर म्हणून माझी आणि चेअरमन म्हणून अन्नपूर्णा चराटी यांची स्वाक्षरी आहे. आम्ही सदर शपथपत्र विधिज्ञ श्री. एस. एस. इंजल, आजरा यांच्या समक्ष केलेले आहे.

प्रश्न – तुम्ही आरोपीला दिलेल्या सर्व रकमेची मागणी करण्या करीता तक्रार दाखल केली आहे ?

उत्तर – आम्ही आरोपीला रक्कम दिलेली असून सदरची तक्रार धनादेशाच्या रकमे करीता दाखल केली आहे.

**३०**. आम्ही आरोपीला दिलेल्या प्रोसेसिंग फी च्या ६,२५,०००/- रुपयांची संपुर्ण मागणी करत आहोत. आम्ही आरोपीला करारनाम्यासाठी दिलेल्या २५,२०,०००/- रुपयांची संपुर्ण रक्कम देखील मागितली आहे. नि. क्र.३७ मध्ये कर्ज मंजूर न झाल्यास प्रोसेसिंग फी ची रक्कम परत देणे बंधनकारक नसून ॲग्रीमेंट चार्जेसची ५० % रक्कम देय असल्याची अट नमूद करण्यात आलेली आहे.

**३१**. नि. क्र.३६ मध्ये परिशिष्ट क मध्ये अनु. क्र.१८ च्या अटी व शर्ती प्रमाणे देखील कर्जप्रकरण फेटाळले गेल्यास प्रोसेसिंग फी ची रक्कम परत देणे बंधनकारक नसून ॲग्रीमेंट चार्जेसची ५० % रक्कम देय असल्याची अट नमूद करण्यात आलेली असून त्यावरती व्हॉईस चेअरमन देशपांडे यांनी स्वाक्षरी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर तरतूदी प्रमाणे आमची संस्था केवळ ॲग्रीमेंट चार्जेसचे १२,६०,०००/- रुपये मिळण्यास पात्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर तरतूदी प्रमाणे आरोपी आमची प्रोसेसिंग फी ची संपुर्ण रक्कम देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी केवळ १२,६०,०००/- रुपये देणे असून

नि. क्र. ४ खाली.

त्याच्याकडून जास्तीची रक्कम उकळण्यासाठी धनादेशा वरती अतिरिक्त रक्कम भरण्यात आली आहे.

**३२**. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आम्ही दाखल केलेल्या धनादेशातील रक्कम देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आमची २२,५०,०००/- रुपये कायदेशीर देणे लागत नसताना आम्ही त्याच्या विरोधात खोटी तक्रार दाखल केली आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १०.०३.२०२६. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.